सांगितलं तर विश्वास बसणार नाही.'

सोनू निगम म्हणतो, 'फॅब्युलस. आर.डी. आता फॅशन स्टेटमेंट झालेत. त्यांच्या समकालीन संगीतकारांत आणि अगोदरही इतर कितीतरी चांगले संगीतकार झाले, 'फक्त आर.डी.च ग्रेट होते!' असं म्हणणं इतर संगीतकारांवर अन्याय करण्यासारखं आहे.'

ट्रेन्ड्स तर येणारच. मध्यंतरी पंजाबी पॉपची लाट आली नव्हती? आज काय दिसतंय? वाईट एकाच गोष्टीचं वाटतं, 'पंचमदांच्या गीतांना उजाळा देण्याचा प्रयत्न' असलं लटकं कारण देत आलेल्या *दिल विल प्यार व्यार*(हे शीर्षक लक्ष्मीकांत-प्यारेलालच्याच एका गीतातून उचललंय!)मध्ये एकही मौलिक गीत नव्हतं. सगळीच आर.डी.च्या क्लासिकलची नक्कल होती. सोलो गीतं ड्युएट आणि अनेक गायकांच्या गीतांतून सादर केली गेली. आर.डी.च्याच अरेंजर्सनी हा आगाऊपणा करून साऊंड ट्रॅक्सना चित्रपटाची हायलाइट ठरवलं. *झंकार बीट्स*चे सगळेच गायक आर.डी.चे चाहते आहेत. 'बॉस कौन है...' गाण्यात पंचमदांना महान संगीतकार ठरवलं गेलं. याबाबत टीका करताना सोनू म्हणतो, 'पंचम काय होते हे या म्युझिक कंपन्या आणि पंचमचे तथाकथित चाहते किती जाणतात? ६०च्या दशकातल्या शंकर-जयकिशनचं एखादं जलदगीत ऐकवून ही पंचमदांची धून आहे असं सांगितलंत तरी त्यांच्या विश्वास बसेल. मला चांगलं आठवतंय,


*झंकार बिट्समध्ये*
रिंकी खन्ना-राहुल बोस

आर.डी.च्या हयातीतच जतीन-ललितना पंचमसारखं संगीत देण्याविषयी सांगण्यात आलं होतं तेव्हा स्वतः पंचमदा घरी बसून होते!'

या वादाचा समारोप करताना आर.डी.चे समकालीन संगीतकार आणि मित्र प्यारेलाल म्हणतात, 'मला वाटतं, आर.डी.ची श्रेष्ठ गीतं मागे पडून सामान्य गीतांचीच चर्चा झाली. पण आता काळ बदललाय. आपणही त्याचे बदलते ट्रेन्ड्स स्वीकारले पाहिजेत. रिमिक्सला बरे दिवस आलेत. संगीताच्या दृष्टीकोनातून रिमिक्स अल्बम चांगले बनतात. पण गायनाचा स्तर आणि व्हिडीयोज हॉरिबल असतात. लोक जे काही करतायत त्यात पंचमवरचं प्रेम हा मुद्दाही तेवढाच महत्त्वाचा असायला हवा, नाही का?

□ डॉ. राजीव विजयकर




# जानकीदास

**१८** जून २००३च्या सकाळी हिंदी चित्रपटसृष्टीने ९३ वर्षीय ज्येष्ठ अभिनेता गमावला... जानकीदास... १९४१च्या *खजांची*मधून चित्रपटसृष्टीत पदार्पण करणाऱ्या जानकीदासनी अनेक दशकं या क्षेत्रावर आपला ठसा उमटवला.

गेल्या अनेक वर्षांपासून हृदयरोगाने पिडीत जानकीदास यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तब्येतीला उतार पडला म्हणून त्यांना घरी पाठवण्यात आलं होतं. त्यानंतर अवघ्या दोनच दिवसांत त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचं निधन झालं.

जानकीदास जेवढे गुणी आणि प्रतिभावंत कलाकार होते तेवढेच प्रवीण खेळाडूही होते. १९४६मध्ये त्यांना झुरिच सायकलिंग चॅम्पियनशीपमध्येही भाग घेतला होता.

मूकपटांपासून भारतीय चित्रपटांत सक्रीय असलेल्या जानकीदास यांनी कारकीर्दीची सुरुवातीला प्रॉडक्शन डिझायनर म्हणून *पत्थर और पायल* आणि *वॉरंट*सारखे चित्रपट केले. १९९६मध्ये जीवनगौरव पुरस्कारप्राप्त जानकीदास यांनी मधुबाला, शोभा आनंद आणि माला सिन्हासारख्या गुणी अभिनेत्रींना चित्रपटक्षेत्रात संधी दिली.

लाहोरच्या एका सधन कुटुंबात जन्मलेले जानकीदास त्याकाळात इंग्रजी आणि इतिहास विषय घेऊन एम. ए. झाले. चित्रपट जगताशी जोडलेली दोन पुस्तकं त्यांनी लिहीली. याशिवाय वर्तमानपत्रं आणि नियतकालिकांतही त्यांनी लेखन केलं.

त्यांच्यामागे दोन मुलगे आणि दोन मुली आहेत.